हे दैनिक मालक मुद्रक प्रकाशक व संपादक कृष्णा चंडिदासराव शेवडीकर यांनी एकजूट प्रिंटर्स '**चैतन्य**' बिल्डींग यात्री निवास मार्ग नांदेड येथे छापून दैनिक श्रमिक एकजूट कार्यालय 'चैतन्य' बिल्डींग यात्री निवास मार्ग नांदेड ४३१६०१(म.रा.)येथे प्रकाशित केले **संपादक:कृष्णा शेवडीकर**
दुरध्वनी (०२४६२)-२३४५०६
Email:ekjoot@gmail.com,
Email:dailyekjoot@yahoo.co.in

# श्रमिक एकजूट

**दैनिक श्रमिक एकजूट ई-पेपरवर उपलब्ध**

**दैनिक श्रमिक एकजूट** ई-पेपर स्वरूपामध्ये जगभरातील वाचकांसाठी उपलब्ध होत आहे. वाचकांना http://shramikekjoot.com या लिंकद्वारे वेबसाईट कनेक्ट करता येईल.

http://shramikekjoot.com ♦ POSTAL REG. NO. G-2 RNP/NND-61-2018-2020 नांदेड ♦ गुरूवार दिनांक ७ ऑगस्ट २०२५ । पाने ६ । वर्ष ५३ वे । अंक ८२ किंमत २ रूपये आर एन आय नं.३७६८७/१९७९

# एकनाथ शिंदे दिल्लीत जाण्यात गैर काय?

## अजितदादा पवार यांचा सवाल

नांदेड (प्रतिनिधी) कदाचित जास्त कामे असतील म्हणून शिवेसेनेचे नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्लीला जात असतील. मीही जातो, मुख्यमंत्री फडणवीस तसेच विरोधी पक्षातील नेते सुद्धा जात असतात, असे उत्तर राष्ट्रवादीचे नेते उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी नांदेड दौऱ्यात पत्रकारांशी बोलतांना दिले. तर एका उच्च पदस्थ अधिकाऱ्याच्या नियुक्तीवर बोलतांना, राज्याचा प्रमुख म्हणून शेवटचा निर्णय हा मुख्यमंत्र्यांचा असतो असे ते म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जास्त होणाऱ्या दिल्लीवारीवद्दल पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलताना ना. अजित पवार म्हणाले, कामाच्या संदर्भात सर्वच दिल्ली येथे जात असतात. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची कामे जास्त असतील म्हणून ते दिल्ली येथे जातात. मीही जातो, मुख्यमंत्री फडणवीस तसेच विरोधी पक्षातील नेते सुद्धा जात असतात. त्यात वावगे काही नाही. तर जो राज्याचा प्रमुख असतो, तो निर्णय घेत असतो. याआधी एकनाथ शिंदे प्रमुख होते, ते निर्णय घ्यायचे. आता देवेंद्र फडणवीस प्रमुख आहेत, ते निर्णय घेतात. त्यामुळे राज्याचा प्रमुख शेवटचा निर्णय मुख्यमंत्र्यांचा असतो, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बेस्टच्या व्यवस्थापक पदी मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री शिंदे यांनी वेगवेगळी नियुक्ती केल्याच्या प्रश्नावर बोलताना केले.



मुंबई येथे कबूतरखाना व सोलापूर येथील माधुरी हत्तीन वद्दल बोलताना ते म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच एक बैठक घेतली. त्यात माधुरी हत्तीन व कबूतर खाना या दोन्ही विषयावर चर्चा झाली. या दोन्ही विषयाबावत सार्वजनिक बांधकाम विभागातील राज्य शासन सकारात्मक आहे. ठेकेदारांची थकीत विलांबद्दल बोलताना ते म्हणाले की, वित्त विभागाकडे जशी डिमांड येते त्याप्रमाणे रक्कम दिली जाते. दर तीन महिन्यांनी वित्त विभाग मागणीप्रमाणे पैशांचा पुरवठा करतो. त्यात पेन्शन, पगार, विकास कामांचा निधी आदींचा समावेश असतो. नुकतेच वित्त विभागाने सार्वजनिक वांधकाम विभागाला ४ हजार कोटी रुपये चा निधी कंत्राटदारांच्या थकलेल्या विला साठी दिला असल्याचे त्यांनी सांगितले. दारूच्या दरात होणाऱ्या बदलावावत विचारलेल्या प्रश्नावर ते म्हणाले की, तुम्हाला कोणी सांगितले असा बदल होणार आहे. प्रसार माध्यम यावावत वोलत आहेत. मंत्रिमंडळाने दारूच्या वाढीव दराबाबत निर्णय घेतला आहे. त्यात कोणताही बदल करण्यात येणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

## मुख्याध्यापक रामराव देवणे यांचा आज सेवापूर्ती सोहळा

नांदेड (प्रतिनिधी)-अर्धापूर तालुक्यातील दिग्रस येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक रामराव देवणे हे सेवानिवृत्त होत असून, त्यांच्या सेवापूर्तीचा सोहळा गुरुवार, दि. ७ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे.शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून शेकडो विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे व समाजमनावर ठसा उमटविणारे मुख्याध्यापक देवणे यांच्या या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदडे, जिल्हा परिषदेचे माजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजीराव कपाळे,पंचायत समिती कंधारचे माजी सभापती बालाजी पाटील पांडागळे, तसेच भाजपाचे जिल्हा प्रवक्ता संतोष पाटील पांडागळे उपस्थित राहणार आहेत.या सेवापूर्ती सोहळ्यास उपस्थित राहावे,असे आवाहन सविता रामराव देवणे, डॉ.अश्विनी रामराव देवणे व डॉ.स्वाती देवणे यांनी केले आहे.



# अजितदादा पवार यांनी केले खतगावकर कुटूंबियांचे सांत्वन




नांदेड (प्रतिनिधी) उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी माजी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते भास्करराव पाटील खतगावकर यांच्या निवासस्थानी भेट देवून खतगावकर यांच्या पत्नी व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माजी संचालिका स्हेनलताताई पाटील खतगावकर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून खतगावकर कुटुंबियांचे सांत्वन केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आमदार प्रतापराव पाटिल चिखलीकर,विधानपरिषद सदस्य विक्रम काळे, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा,माजी आमदार मोहनअण्णा हंबर्डे,राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षा डॉ.मिनलताई पाटील खतगावकर,माजी उपमहापौर सुरजीतसिंह गिल यांचेसह राष्ट्रवादी कार्याकर्ते उपस्थित होते.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी भास्करराव पाटील खतगावकर यांचे सांत्वन करण्यासाठी नांदेड दौरा आयोजित केला होता.



माजी मंत्री व ज्येष्ठ काँग्रेस नेते शिवाजीराव मोघे यांनी माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांची सांत्वनपर भेट घेतली सोबत दैनिक श्रमिक एकजूटचे व्यवस्थापकीय संपादक किरण कुलकर्णी हेही होते.

## स्व.बळवंतराव चव्हाण स्मृतिप्रीत्यर्थ आज पुष्पांजली कार्यक्रम...!

नायगाव (प्रतिनिधी)-ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार स्वर्गीय बळवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गुरुवार दि. ०७ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता हनुमान मंदीर नायगांव येथे पुष्पाजंलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पुष्पांजली कार्यक्रमांसोबतच येत्या २६ ऑगस्ट रोजी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा नांदेड जिल्ह्याचे खासदार कै. वसंतराव बळवंतराव चव्हाण यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त स्व. आ. बळवंतराव चव्हाण आणि स्व.खा वसंतराव बळवंतराव चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचा अनावरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. या सोहळ्या संदर्भात नियोजन व पूर्व तयारी याबाबत बैठकीचेही आयोजन यावेळी करण्यात आले आहे. या बैठकीस नायगांव शहरातील व्यापारी बंधु प्रतिष्ठीत नागरीक, मित्र, परिवार, हितचिंतकांनीङ्गआवर्जुन उपस्थित रहावे, असे आवाहन खासदार रवींद्र चव्हाण यांच्या जनसंपर्क कार्यालयातून करण्यात आले आहे.

## स्व.बळवंतराव चव्हाण व स्व.वसंतराव चव्हाण यांच्या सभामंडपाचे भूमिपूजन

नायगाव (प्रतिनिधी)- स्व. खा.वसंतराव पाटील चव्हाण यांच्या २६ ऑगस्ट रोजी होणाऱ्या प्रथम पुण्यस्मरण दिनाच्या कार्यक्रमानिमित्त तथा स्व.माजी आ. बळवंतराव पाटील चव्हाण(अण्णा)व स्वर्गीय खा.वसंतराव.पाटील चव्हाण यांच्या पूर्ण कृती पुतळ्याच्या अनावरण सोहळयाच्या कार्यक्रमांचे हनुमान मंदिर नायगाव (बा). परिसरातील मंडप उभारणीचा भूमिपूजनाचा कार्यक्रम करण्यात आला



यावेळी नायगाव नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष विजय पाटील चव्हाण व मित्रमंडळाच्या हस्ते संपन्न झाला यावेळी नंदा देशाई. नारायण जाधव, पंढरीनाथ भालेराव.संजय चव्हाण,शिवाजी कल्याण,रविंद्र भालेराव,दयानंद भालेराव, माणिक चव्हाण,शरद भालेराव, अजिक्य कल्याण,साईनाथ चन्नावार, विठ्ठल बेळगे, विजय भालेराव आदी मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






